सांगली - कोल्हापूर - मुंबई

नवे विचार...नवी सुरुवात

■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ९२ ■ रविवार, ०६ जुलै २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




## संक्षिप्त...

### दाखल्यांसाठी मुद्रांक शुल्क माफ

मुंबई : हॅलो प्रभात

सर्वप्रकारच्या दाखल्यांसाठी जोडाव्या लागणाऱ्या प्रतिज्ञापत्राचे पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. आता पाचशे रुपयांच्या स्टॅम्पपेपरऐवजी साध्या कागदावर अर्ज करून विविध प्रमाणपत्रे मिळणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### सातारा - कोल्हापूर डेमू रेल्वेचा पुन्हा खेळखंडोबा

कोल्हापूर : हॅलो प्रभात

सातारा-कोल्हापूर डेमू रेल्वेचा शुक्रवारीही पुन्हा खेळखंडोबा झाला. साताऱ्याहून सुटलेली ही गाडी बंद पडली. परिणामी वेळेवर ही गाडी न आल्याने शेकडो प्रवाशांचे  हाल झाले. मिळेल त्या वाहनाने अनेकांनी कोल्हापूर गाठले. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या प्रकारामुळे प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाविषयी संताप व्यक्त केला.

### पालखी महामार्गावर पथदिवे बंदच

पंढरपूर : हॅलो प्रभात

मोहोळ -पंढरपुर -आळंदी पालखी मार्गावरील मोहोळ बसस्थानक ते चंद्रमौळी गणेश मंदिर पर्यंतचे अनेक पथदिवे गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून बंद आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या अपघाताची शक्यता आहे.

# बाळासाहेबांना जमलं नाही ते फडणवीसांना जमलं : राज ठाकरे

## एकत्र आलोय, एकत्र राहण्यासाठी : उद्धव ठाकरे

मुंबई : हॅलो प्रभात

**जवळपास २० वर्षांनी उद्धव आणि मी एकत्र येत आहे. आम्हाला एकत्र आणणं बाळासाहेबांना जमलं नाही, जे इतर कोणालाही जमलं नाही, ते देवेंद्र फडणवीस यांना जमलं, अशा शब्दात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा चिमटा काढला. इतकंच नव्हे ठाकरे कुटुंबातील मुलं बॉम्बे स्कॉटिशमध्ये शिकले, याकडे लक्ष वेधणाऱ्या भाजप नेत्यांच्याही खास 'ठाकरे शैली'त त्यांनी समाचार घेतला.**



राज्य सरकारने शालेय शिक्षणात हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मराठी जनतेच्या एकजुटीचा विजय जल्लोष साजरा करण्यासाठी शिवसेना (ठाकरे) आणि मनसेकडून शनिवारी वरळीतील एन.एस.सी.आय. डोम येथे मराठी जनांचा विजय मेळावा घेतला. यावेळी राज ठाकरे यांनी मराठी लोकांना उद्देशून भाषण केले.

यावेळी राज ठाकरे म्हणाले, मी एका मुलाखतीत म्हटलं होतं की, कोणत्याही वादापेक्षा आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र आणि मराठी माणूस मोठा आहे. तेव्हापासून राज्यात वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. मात्र, एक गोष्ट खरी आहे की, जवळपास २० वर्षानंतर उद्धव आणि मी एकत्र येत आहे. जे बाळासाहेब ठाकरें यांना जमलं नाही, जे राज्यातील इतर कोणत्याचं नेत्याला जमलं नाही, ते देवेंद्र फडणवीस यांना जमलं. महाराष्ट्राकडे, मराठीकडे कोणी वेडेवाकडे बघायचं नाही. हिंदीचं अचानक कुठुन आलं समजलंच नाही. लहान

### उद्धव आणि राज १८ वर्षांनी आले एकत्र



मुलांवर जबरदस्ती केली जाते. कोणाला विचारायचं नाही. सत्ता आणि बहुमतावर सगळ लादायचं. तुमच्याकडे सत्ता असेल ती विधानभवनात पण, आमच्याकडे सत्ता आहे ती रस्त्यावर, असा इशारा त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिला.

आमच्या दोघातील अंतरपाठ अनाजीपंतांनी दूर केला. आमचं एकत्र दिसणे महत्त्वाचे आहे. आम्ही एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठी. आम्ही दोघांनी त्यांचे वापरा आणि फेकून द्या धोरण अनुभवलं आहे. आता आम्ही दोघे मिळून तुम्हाला फेकणार आहोत , अशा शब्दांमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मनसेबरोबरील युतीची घोषणाच केली.

राज्य सरकारने शालेय शिक्षणात हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मराठी जनतेच्या एकजुटीचा विजय जल्लोष साजरा करण्यासाठी आयाोजित विजय मेळावात बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, प्रत्येकवेळीस आम्ही एकत्र येणार का,असा प्रश्न त उपसथित केला जात होता. आता आमचा म हा मराठीसाठी नाही तर महापालिकेसाठी आहे, असा आरोप केला जात आहे. मात्र आम्ही सत्तेसाठी नाही तर मराठीसाठी एकत्र आलो आहोत.

मराठी माणूस आपआपसात भांडला आणि दिल्लीतील गुलाम आपल्यावर राज्य करु लागले आहेत. पुन्हा एकदा ते आपल्या मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न करणार आहेत. आता तुम्ही पालख्याचे भोई होणार की मराठीला पालखीत बसवणार, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

आम्ही कोणत्याही भाषेच्या विरोधात नाही. मात्र हिंदीची सक्ती कधीच सहन करणार नाही. मी मुख्यमंत्री असताना हिंदी भाषेंची सक्ती केली नव्हती. आता हिंदी भाषेची सक्ती मान्य करणार नाही, असा इशारही उद्धव ठाकरे यांनी केला.

# महावितरणची ४७.८५ कोटींची कामे पूर्ण

सांगली : हॅलो प्रभात

महावितरणच्या 'नवीन सेवा जोडणी' (एनएससी) योजनेमुळे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक आणि इतर (कृषी वगळून) ग्राहकांना नवीन वीज जोडणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी आता विनाशुल्क मिळत आहे. या योजनेअंतर्गत कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांमध्ये गेल्या सहा महिन्यांत (जानेवारी ते जून २०२५) तब्बल ४७.८५ कोटी रुपयांची कामे पूर्ण झाली असून, १७,७६८ नवीन ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

आज ग्राहकांना महावितरणच्या विविध सेवा घरबसल्या ऑनलाइन उपलब्ध असून, नवीन वीज जोडणीसाठी अर्ज, सेवा जोडणी शुल्क व सुरक्षा ठेव यांचे पेमेंट ऑनलाइन पद्धतीने करता येते.

महावितरणकडून उच्चदाब व लघुदाब वाहिन्या, वितरण रोहित्रे इत्यादी यंत्रणा 'नवीन सेवा जोडणी' (एनएससी) योजनेतून उभारल्या जातात. यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्धारीत केलेल्या कृती मानकांनुसार कालमर्यादेचे काटेकोर पालन करण्यात येते, त्यामुळे ग्राहकांना अल्प खर्चात व विहित कालावधीत वीज जोडणी मिळते.

# विलास काळेबाग यांची निवड

घाटनांद्रे : हॅलो प्रभात



आटपाडी येथील विलास काळेबाग यांची भारतीय जनता पार्टीच्या राज्य परिषदेवर निवड करण्यात आली असून,त्यांच्या या निवडीचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.त्यांची ही निवडी चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण, चंद्रकांत पाटील, मकरंद देशपांडे, आमदार पडळकर, जिल्हाध्यक्ष सम्राट महाडीक यांनी विश्वास दाखवून त्यांना काम करण्याची ही संधी दिली आहे.

# शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करा : नाना पटोले

मुंबई : हॅलो प्रभात

गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात खरीप हंगामाचे पैसे अद्याप शेतकऱ्यांना दिलेले नाहीत. DBT च्या माध्यमातून आम्ही शेतकऱ्यांना पैसे दिले, असा गवगवा करण्यात आला. शेतकऱ्यांनी पिकवलेले धान्य समर्थन मूल्याने खरेदी केले गेले पाहिजे.

यासाठी केंद्र सरकारने योजना आणली; आणि ते धान्य घेतल्यानंतर ते पैसे देणे भाग आहे. पण एक वर्षापासून सरकारने शेतकऱ्यांना पैसे दिलेले नाहीत. शेतकऱ्याने शेती कशी करावी, हा प्रश्न विधानसभेत बोलताना नाना पटोले यांनी मांडला.



लातूर जिल्ह्यातील एक शेतकरी स्वतःला औताला जुंपून घेतो आणि शेतकरी भगिनी त्याला हाकते आहे, असे चित्र संपूर्ण जगात प्रसिद्ध झाले.

लातूर जिल्ह्यातील ही घटना छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राला शोभणीय नाही. राज्यातील शेतकऱ्याने स्वतःला जुंपून घ्यावे, आणि मग नंतर सरकारने त्या शेतकऱ्याचे कर्ज माफ करावे, त्याला बैलजोडी देऊन मदत करावी, त्यासाठी वाट बघावी का?

पटोले पुढे म्हणाले की, सरकारने गोरक्षणाचा कायदा केला. गोंदिया जिल्ह्यात शेतकरी उन्हाळ्यात शेतीसाठी बैल घेऊन जात असताना पोलिसांनी त्यांना पकडले. त्यांचे बैल जप्त केले आणि तथाकथित गोरक्षकांच्या स्वाधीन करून त्यांच्या संस्थेत पाठवले. मी कलेक्टरला फोन केला असता,

त्यांनी ठाणेदाराला सांगून सोडविण्यासाठी सांगितले; परंतु या तथाकथित गोरक्षकांनी ते बैल देण्यास नकार दिला. त्यांनी ते परस्पर विकून टाकले.

हे तथाकथित गोरक्षक शेतकऱ्यांना लुटत आहेत. यावर सरकारने उपाययोजना करणे गरजेचे आहे. काल घडलेली घटना राज्याला भूषणावह नाही. शेतकऱ्यांची चेष्टा सरकारने लावली आहे.















## संपादकीय

# माऊलीच्या दर्शनाची भक्तांना आस

भारतीय संस्कार संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ मानली जाते. येथील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक परंपरेने सामाजिक परिवर्तन घडवण्यामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी या संस्कृतीत सामावलेली आहे. विशेषता साधुसंतांनी दिलेली शिकवण संपूर्ण समाजाला अध्यात्मिकतेच्या दिशेने घेऊन जात आहे. धार्मिक व आध्यात्मिक विचारधारेमुळेच राष्ट्राची विविधतेतून एकता दिसून येत आहे.भारत हा एक विशाल व महाकाय देश आहे. येथे विविध धर्माचे लोक एकतेने व स्नेहभावाने राहतात. प्रत्येक धर्माची परंपरा वेगळे असले तरी प्रत्येक जण भारतीय म्हणून एकमेकांच्या धार्मिक कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. भारतात विविध धर्मियांचे सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.विशेषता महाराष्ट्रात आषाढी एकादशीच्या वारीला खूप महत्त्व आहे. पंढरपूरच्या विठ्ठल रुक्माई च्या दर्शनासाठी अतुर झालेले लाखो भाविक मोठ्या उत्साहात वारकरी दिंडीत सहभागी झालेले असतात.आळंदीपासून सुरू झालेल्या या वारकऱ्यांच्या दिंडीत हजारो महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक व विविध क्षेत्रातील असंख्य व्यक्तींचा यामध्ये सहभाग असतो. भारतीय संस्कृतीचे एक अनोखे दर्शन या निमित्ताने अनुभवाला मिळते. संपूर्ण महाराष्ट्रात विठ्ठल रुक्माई च्या जय घोषाने वातावरण पूर्णपणे भक्तीमय होऊन गेलेले असते. प्रत्येक शाळा महाविद्यालय यामधील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने वारकरी दिंडी मध्ये सहभागी होतात. विशेषता स्कूलमध्ये लहान लहान मुले विठ्ठल रुक्माईच्या पोशाखात आपल्या अनोख्या धार्मिक संस्कृतीचे दर्शन घडवितात. दरवर्षी गौरीशंकरच्या डॉ. पी. व्ही. सुखात्मे इंग्लिश मीडियम स्कूल,लिंब व खटाव येथील सनशाईन इंग्लिश मीडियम स्कूल येथील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने आषाढी एकादशीचा दिंडी सोहळा साजरा करतात. शैक्षणिक ज्ञानाबरोबर भक्तीचा लळा या विद्यार्थ्यांना लागला पाहिजे ही भूमिका घेऊन या स्कूलमधील शिक्षक आषाढी एकादशी दिंडी वारीचे आयोजन करीत असतात. या वारकरी दिंडीतून खऱ्या अर्थाने उद्याचे नवराष्ट्र घडवणारे भावी पिढी निर्माण होणार आहे. विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोवला, विठ्ठल विठ्ठल कानडा राजा पंढरीचा हे असे असंख्य अभंग गात माऊली माऊलींचा गजर करीत हजारो वारकरी आषाढी एकादशीला पंढरीची वाट धरतात. माऊली माऊली ज्ञानबा तुकाराम सोबतच हर हर महादेवाचा गजर करीत हजारो वारकऱ्यांनी भक्तिमय वातावरणात पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी आतुर झालेले असतात. साधुसंतांच्या शिकवणीचे तंतोतंत पालन लाखो वारकऱ्यांकडून होत असते. भक्तीरसात न्हाऊन निघालेल्या या वारकऱ्यांना फक्त विठ्ठलाच्या रुक्मिणीच्या भेटीतच मोठे समाधान असते. वारकरी संप्रदायाला खरंतर मोठा वारसा लाभलेला आहे. ही एक अध्यात्मिक चळवळ नाही तर एक सामाजिक समता आणि सहकार्याचे मूर्त स्वरूप आहे.

# मा.डॉ.अण्णासाहेब डांगे
## ग्रामीण विकासातील दीपस्तंभ



**दै. हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हयातील कोडोलीच्या माळरानातून उगम पावलेली व सांगली जिल्हयातील इस्लामपूरच्या मातीतून बहरलेली एक प्रेरणादायी कथा, आज महाराष्ट्राच्या शिक्षण आणि ग्रामीण विकासाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरली गेलेली आहे. ती कथा आहे डॉ. अण्णासाहेब डांगे यांची. शिक्षण, समाजसेवा, सहकार, राजकारण आणि सांस्कृतिक बांधिलकी या सर्व क्षेत्रात आपला ठसा उमटवणाऱ्या डॉ. अण्णासाहेब डांगे यांच्या कार्याचा मागोवा घेताना आपल्याला ग्रामीण महाराष्ट्राच्या अंतःकरणापर्यंत पोहोचलेली ही वाट बुद्धेची, सेवाभावाची आणि परिवर्तनाची असल्याचे दिसून येते.

डॉ.अण्णासाहेब डांगे यांचा जन्म आषाढी एकादशी या पुण्य दिनादिवशी झाला. जणू काही विठोबाच्या चरणाशी जोडलेले हे जन्मक्षण त्यांच्या जीवनाकार्याला अध्यात्मिक अधिष्ठान देणारे ठरले. या जन्मदिनी त्याचं आणि पंढरपूरच्या विठोबाचं एक विलक्षण नातं तयार झालं, भक्ती आणि कर्तव्य याचं. त्यामुळेच त्यांना पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या अध्यक्षपदाची संधी लाभली.

या भूमिकेतून त्यांनी मंदिर प्रशासनात पारदर्शकता आणली, भक्तांसाठी सोयीसुविधा केल्या, अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या दर्जात सुधारणा केली. आषाढी वारीच्या आयोजनात त्यांनी सुचवलेले बदल आणि व्यवस्थापन कौशल्य हे आजही आदर्श मानले जातात. भक्त, वारकरी आणि मंदिर प्रशासन यांच्यात सेतू म्हणून त्यांनी दक्षतेने कार्य केले.

### शैक्षणिक क्रांतीचे शिल्पकार

'संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना ही त्यांनी समाजास दिलेली सर्वांत मोठी देणगी आहे. सन १९९९ मध्ये त्यांनी आष्टा, जि. सांगली येथे अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. हे कॉलेज ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक तंत्रशिक्षणाचे प्रवेशद्वार ठरले. त्यानंतर आयुर्वेद कॉलेज, फार्मसी, नर्सिंग, डी.एड.,बी.एड.सैनिक स्कूल, कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, इंटरनॅशनल स्कूल, प्राथमिक, माध्यमिक शिक्षणासाठी शाळा यांची उभारणी केली.

विशेषतः वंचित, गरीब, दलित आणि दुर्लक्षित समाजघटकांच्या विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळांची उभारणी करून त्यांनी खऱ्या अर्थाने शिक्षण तळागाळापर्यंत पोहचविले. या शाळांमुळे अनेक घरातील पहिला विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आला, या शाळातून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी आज जीवनाच्या

विविध क्षेत्रात अत्यंत उत्तमपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. शिक्षण संस्थांच्या माध्यमातून त्यांनी ज्ञानाबरोबर आत्मविश्वास, संस्कार आणि सशक्तीकरणाचे कार्य केले.

या संस्था आत्मविश्वासाचे, स्वप्नांचे आणि भविष्यातील संधीच्या हक्काचे व्यासपीठ बनत गेल्या. शैक्षणिक गुणवत्तेतही त्यांनी कसूर केली नाही. NAAC 'A++' आणि NBA मान्यता ही त्याच प्रयत्नाची फळे आहेत. आज अभियांत्रिकी महाविद्यालय 'स्वायत महाविद्यालय' म्हणून अत्यंत दिमाखदारपणे स्वर्यरत आहे. यापाठीमागे त्यांचा व्यापक दृष्टीकोन आहे. म्हणूनच ते आजच्या आधुनिक शैक्षणिक क्रांतीचे शिल्पकार ठरतात.

### राजकीय जीवन, सेवेसाठी राजकारण

डॉ.अण्णासाहेब डांगे यांचा राजकारणातील प्रवेश हा समाजकारणाच्या विस्तारासाठी होता, १९९५ ते १९९९ या काळात महाराष्ट्र शासनात ग्रामीण विकास, जलपुरवठा आणि निवृत्त सैनिक कल्याण मंत्री म्हणून त्यांनी कार्य केले. टंचाईने ग्रस्त भागामध्ये जलयोजना राबविणे, रस्ते आणि पायाभूत सुविधा निर्माण करणे या सारख्या योजना त्यांनी प्रभावीपणे राबविल्या.

त्यांनी विधिमंडळामध्ये काम करताना ग्रामीण महाराष्ट्राच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली. गोरगरीब, दिन-दलित, वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने सरकारचे लक्ष वेधले आणि या घटकांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. त्यांच्या या कामगिरीची दखल घेवून त्याना विधिमंडळातील 'उत्कृष्ट संसदपटू' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### सहकार क्षेत्रातील योगदान

डॉ.अण्णासाहेब डांगे यांनी केवळ शिक्षण आणि राजकारणापुरतेच आपले कार्य मर्यादित ठेवले नाही, तर ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासासाठी त्यांनी सहकार क्षेत्रातही अमूल्य योगदान दिले. त्यांनी स्थापन केलेली 'दीनदयाळ मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी' ही एक आदर्श संस्था आहे. या सूतगिरणीने मागासवर्गीय, अल्पभूधारक शेतकऱ्यांना रोजगार, स्थैर्य आणि आर्थिक आत्मनिर्भरतेकडे नेले. कामगारांच्या हिताचे धोरण, पारदर्शक व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा मिलाफ हि या सूतगिरणीच्या यशाचे गमक आहे.

### चौंडीतील महत्वपूर्ण कार्य

चौंडीतील प्रकल्प हे केवळ ऐतिहासिक स्मारकांची पुनर्रचना नसून, डॉ. अण्णासाहेब डांगे यांच्या दूरदृष्टीचा, सामाजिक बांधिलकीचा आणि सांस्कृतिक अभिमानाचा भव्य दस्तऐवज आहे. अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य ग्रामीण जनतेसमोर जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी चौंडी येथे 'अहिल्यादेवी प्रतिष्ठान' ध्या माध्यमातून राजवाडा, गढी, नक्षत्र उद्यान, कीर्तीस्तंभ, महेश्वर घाट, मंदिर परिसर आणि आधुनिक संग्रहालय उभारून श्रद्धा, ज्ञान आणि विकास असे ऐतिहासिक कार्य केले. यामागे वैचारिक बांधिलकी, व्यवस्थापन कौशल्य आणि सचोटी यांचा समन्वय दिसून येतो.

या प्रकल्पामुळे चौंडी हे गाव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक नकाशावर झळकले, पण त्याहीपलीकडे त्यांच्या या कार्यातून स्त्रीशक्ती विषयीचा अभिमान, नव्या पिढीला इतिहासाची जाणीव, आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी या गोष्टी साध्य झाल्या, त्यांनी गावाच्या प्रत्येक वस्तीमध्ये रोजगारनिर्मितीचे स्रोत निर्माण केले, महिलांसाठी स्वयं सहायता गट उभे केले, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संधी उपलब्ध केल्या आणि हे सर्व खुले केले. त्यांचे हे कार्य म्हणजे मुल्याधिष्टीत विकास आहे.

### ग्रंथ लेखन आणि विविध सन्मान

डॉ.अण्णासाहेब डांगे यांची सांस्कृतिक जाणीवही तितकीच समृद्ध आहे. त्यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर ग्रंथलेखन केले. त्यांच्या भाषणांतून, संस्थांच्या नामकरणांतून, शैक्षणिक धोरणांतून व त्यांनी माऊलींच्या नावाने स्थापन केलेली शिक्षण संस्था यावरून त्यांची सांस्कृतिक जाणीव दृष्टीस येते. त्यांच्या कार्याची दखल घेत स्टार एज्युकेशन अॅवॉर्ड २०२४ मध्ये त्यांना 'बेस्ट ट्रस्टी' म्हणून गौरविण्यात आले. टिळक विद्यापीठाचा 'डी.लिट' सन्मान, विविध सामाजिक संस्था व विद्यापीठांमधून मिळालेले जीवनगौरव पुरस्कार, हे त्यांच्या अविरत सेवेचे फलीत आहे.

### जिथे स्वप्नांना जमीन मिळते,
### तिथे उगम होतो एक नव्या युगाचा

ही ओळ त्यांच्या कार्याला लागू होते. शिक्षण, सहकार, राजकारण, समाजसेवा आणि संस्कृती या सर्व अंगांनी 'ग्रामीणजीवनाचा कायापालट करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. डॉ. अण्णासाहेब डांगे हे केवळ एक व्यक्तिमत्व नाही, तो एक विचार आहे व समाजाला दिशा देणारे एक चालते-बोलते विद्यापीठ आहे. त्यांचे शिक्षण, सहकार, राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक सुधारणा या क्षेत्रातील कार्य समाजाला विकासाच्या वाटेवर नेणारे आहे. त्यांनी केलेले हे कार्य महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासास दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे. त्यांना वाढदिवसा निमित्ताने दीर्घायुष्य व समृध्द जीवनाकरिता मनःपूर्वक शुभेच्छा...!

**दिलीप शिरसट**
मुख्याध्यापक : माध्यमिक आश्रमशाळा, हातकणंगले


**हॅलो प्रभात**

**आषाढ महिन्यातील पहिला दिवस... हा दिवस महाकवी कालिदास दिन म्हणून साजरा होतो. शनिवार दिनांक ६ जुलैपासून आषाढ महिन्याला सुरुवात होत आहे. त्यानिमित्त...**

संस्कृत भाषेमधील महान साहित्यकार महाकवी कुलगुरू कालिदास यांचे साहित्य हजारो वर्षांपासून सर्वांना प्रेरणादायी ठरले आहे. कालिदास यांच्या साहित्याचा अभ्यास केल्याशिवाय संस्कृत भाषेचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. संस्कृत भाषेमध्ये त्यांनी अतिउच्च दर्जाचे साहित्य भारतवर्षाला दिलेले आहे.

आषाढ महिना कालिदासांचा महिना म्हणून साजरा होतो. कालिदासप्रेमी नागपूरजवळील रामटेक येथे असलेल्या कालिदासांच्या स्मृतिस्थळाला भेट देतात. कालिदास यांच्याविषयी सर्वच सौंदर्यप्रेमी, कलाप्रेमी, कवी, नाटककार, संस्कृतचे विद्यार्थी व अभ्यासक यांना कालिदासांविषयी अतिउच्च प्रेम, आदरभाव आणि त्यांच्या साहित्यनिर्मितीविषयी उत्सुकता आहे. जगातील कोणताही वाचक कोणत्याही भाषेत एकदा कालिदासांची साहित्यकृती हाती घेतली की पूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेवीत नाही. असे जगभर प्रसिद्ध पावलेले महाकवी आणि महान नाटककार कालिदास यांची आषाढातील 'मेघदूता'मुळे श्रावण आठवण न होणे शक्यच नाही. कालिदासांच्या नावावर जवळजवळ ३० साहित्यकाव्ये लिहिलेली आहेत. त्यापैकी ७ महाकाव्ये आहेत असे मानले जाते. संस्कृत साहित्यामध्ये त्यांचे स्थान अतिउच्च कोटीतले आहे. त्यांच्या 'ऋतुसंहार', 'कुमार संभवम रघुवंशम मेघदुतम या कालेषु रचनाम' तसेच 'मलाविकाग्निनित्रम विक्रमोवंशीय', 'अभिज्ञान शाकुंतलम' या संस्कृतमधील नाट्य-कम-महाकाव्य रचनेमुळे जाऊन त्यांना संस्कृत विद्वान म्हणून भारतभूमीत मान्यता मिळाली. तसेच ती जगभरात पसरली. साहित्यविश्वात ते अजरामर झाले. त्यामधील 'कुमार संभवम' व 'रघुवंश' ही दोन महाकाव्ये, 'मेहदूत' आणि 'ऋतुसंहार' अशी दोन खंडकाव्ये आहेत. ऋतुसंहार हे काव्य त्यांच्या इतर साहित्य कृतीच्या तुलनेने फार लहान आहे. त्यांच्या दीर्घ निसर्गकाव्याचे सहा भाग आहेत. रायडर या ऋतुसंहारला 'सवअमे बंसमदकंत' म्हणतात. निसर्गसौंदर्यामुळे तरुण मनाला भुरळ पडते. जो तरुण प्रेमाचे स्वप्न बघतो त्याला या जादुभऱ्या ऋतुचक्राच्या प्रेमात पडल्याशिवाय राहता येत नाही. निसर्गाने निर्माण केलेल्या ऋतुचक्राच्या प्रेमावर हे काव्य आहे.

'कुमारसंभवम' हे प्रसिद्ध त्यांच्या पाच महाकाव्यातील सुंदर, संस्कृत रचनेचे एक उत्तम उदाहरण आहे. यात हिमालयाचे वर्णन येते. हे काव्य कालिदासांनी 'शिवाला' वाहिले आहे. त्यामुळे जगाच्या जन्मदात्याच्या प्रेमाबद्दल वर्णन करण्याचे कालिदासांनी यात धाडस केलेले आहे. मूळ कल्पना ही स्कंद



६ जुलै : कालिदास दिन...

आणि शिवपुराण यांच्यावर आधारित आहे. शिवाबद्दल उमा-पार्वतीचे प्रेम याचे परिणामकारक तसेच सुदंरतेचे शृंगारिक वर्णन आहे. हे महाकाव्य संस्कृतप्रेमींच्या मनात कायमचे स्थान मिळवून जाते.

रघुवंशम कालिदासांच्या महान काव्यातील एक महान रचना आहे. यात त्यांच्या साहित्यातून हे काव्य १९ विभागात रचले आहे.

काव्यातून रघु, अजा, दशरथ राम आणि सीता यांच्या आदर्शवादाचे वर्णन आहे. ही रचना मानविमता व सत्यता याच्या जवळची आहे. ही त्यांची चांगली रचना आहे. या काव्याच्या सुरुवातीलाच कालिदास रामायण लिहिणाऱ्या वाल्मिकीचे आभार मानतात.

'मेघदूतम' हे महाकाव्य इतर महाकाव्यांच्या तुलनेत फारच लहान काव्य आहे. मेघदूतम हे खंडकाव्य आहे. या खंडकाव्याची कल्पना कालिदासांनी अशी रचली आहे, की रामगिरीतील शापित यक्ष पत्नी अलका विरहाने व्याकुळ झालेली आहे. तेव्हा कालिदास निर्मित यक्ष प्रियकर पत्नीला आषाढातील मेघालाच सांत्वनपर प्रेम संदेश पाठविण्यासाठी दूत बनवितो. येथे कालिदासानी आषाढी मेघालाच दूत बनविले आहे. यात शंभरच्यावर कडवे आहेत. स्त्रीच्या उत्कट प्रेमावर जिवंत राहणाऱ्या मानवाची ही कथा मेघदूतममध्ये विस्तारितरीत्या आंतरलेली आहे. पहिल्या भारतवर्षातील निरनिराळ्या प्रादेशिक निसर्गसौंदर्यांचे वर्णन आहे. तर दुसरा भाग आशा, भीती, विरह आणि इच्छापूर्ती विचारांवर आहे. यामध्ये माणूस प्रेमाशिवाय जिवंत राहू शकत नाही हे दाखविले आहे. ही रचना काव्यप्रेमींच्या नजरेतून सुटू शकत नाही. सिंहली भाषांतही मेघदूतममध्ये अनुवाद झालेले आहेत. यावर ५० टीकाग्रंथ लिहिण्यात आलेले आहेत.

'मलविकाग्निनित्रम' ही रचना म्हणजे एक महान नाटक. नामवंत नाटककारांपेक्षा कालिदास हे काही कमी नव्हते. त्याचबरोबर ते महाकवी तर होतेच, पण त्यांच्यामधला नाटककार मोठा की कवी मोठा हे 'मलाविकाग्निनित्रम' वाचल्यावर फारच कठीण आहे असे वाटते. एवढे निश्चित आहे की, ते संस्कृतमधील संव्यासाची आहेत. आनंदी कवी आणि प्रतिभावंत नाटककार, रचनाकार हे गुण कवीतच एका ठिकाणी दिसतात. कालिदास राजकवी असल्यामुळे त्यांनी राजेशाही, राजदरबारी घरातील प्रेमाचे नाटकीय सादरीकरण मोठ्या गमतीदारपणे या रचनाकृतीत सादर केलेले आहे. या नाटकातून प्रणय, स्पर्धा राग, अनुनय, वंचना, फजिती अशा अनेक भावनांचे चित्रण आलेले आहे. प्रेमात प्राविण्य असलेल्या अग्निमित्र रागावर ही नाट्यकृती आधारित आहे. कालिदासांच्या रचना पाहता पाऊस आणि त्यामुळे निर्माण होणारे प्रेम वात्सल्य यांचे अतूट नाते आहे. ***अशा या महान महाकवी कुलगुरू कालिदासांना विनम अभिवादन..!***

# आषाढी-देवशयनी एकादशी पंढरीची वारी...

**हॅलो प्रभात**

**आषाढ महिना लागला की वारकऱ्यांना आषाढी एकादशीचे व पंढरपूरच्या वारीचे वेध लागतात. वारकऱ्यांसमोर पंढरपूरच्या विठ्ठलाची स्वयंभू मूर्ती उभी राहते. या महिन्याला जे महत्त्व प्राप्त झाले आहे ते पंढरपूरच्या वारीमुळे. वारी ही वारकऱ्यांचे विठ्ठलभक्तीचे एक अंग होऊन बसले आहे. सर्व भेदाभेद, सर्व मर्यादा, सर्व बंधने झुगारून दिंड्यांमध्ये सामील होऊन हे वारकरी विठ्ठलाच्या प्रेमापायी पंढरीला पायी जातात. या एका दिवसासाठी आठ-दहा लाख वारकरी साऱ्या महाराष्ट्रातून जात असतात.**

या विठ्ठलाचे रूप इतर देवतांपेक्षा वेगळे आहे. हे रूप मानवी स्वरूपाचे असून त्याच्या हातात इतर देवतांप्रमाणे कोणतीही शस्त्रे किंवा आयुधे नाहीत. तर हा विठ्ठल आपले दोन्ही हात कमरेवर ठेवून भक्तांची वाट पाहात युगानूयुगे विटेवर उभा आहे. श्रीराम किंवा श्रीकृष्ण यांचे अवतार दुष्टांचा संहार व भक्तीच्या भागवत धर्माची स्थापना असे द्विस्वरूपाचे होते. पण या विठोबाचा अवतार फक्त भक्तीच्या भागवत धर्माचे रक्षण करणे हाच होता. म्हणूनच त्याच्या हातात कोणतेही शस्त्र नाही. तो कढीवर हात ठेवून भक्तांना जणू सांगतो की, संसाररूपी माया नदीचे पाणी फक्त कमरेपर्यंत आहे तेव्हा भक्तांनी मायारूपी नदी ओलांडून माझ्याकडे यावे. हा विठोबा गळ्यात तुळशीच्या माळा घालून 'कर कटिवरी उभा विटेवरी' या स्थितीत एकटाच वर्षानुवर्षे उभा राहून भक्तांची वाट पाहात आहे व त्यांना दर्शन देत आहे. अशी वारी फार पुण्यदायी मानली जाते. वारकरी व विठ्ठल भक्त ही वारी न चुकविता नियमित करीत असतात. ही प्रथा फार काळापासून चालू आहे. ही पद्धत ज्ञानेश्वरांपूर्वीही अस्तित्वात होती. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे नियमित पंढरपूरला वारी करीत असत. ज्ञानेश्वर व इतर सर्व संत मंडळी ही वारी करीत असत. या संतांच्या निर्वाणीनंतर अलीकडे या संत मंडळींच्या पादुका पालखीत ठेवून त्या ज्यांच्या त्यांच्या गावापासून पायी प्रवास करत या दिवशी या पादुकांना विठ्ठलाचे दर्शन घडवायचे अशी प्रथा चालू आहे.

**आजअखेर अशा आठ संतांच्या पालख्या अशाप्रकारे प्रत्येक वर्षी वाटचाल करीत आहेत. त्या अशा :**

१) आळंदीपासून संत ज्ञानदेवांची २) देहूपासून संत तुकारामांची ३) पैठणपासून संत एकनाथांची ४) त्र्यंबकेश्वराहून संत निवृत्तीनाथांची ५) एदलाबादेपासून संत मुक्ताबाईंची ६) मच्छिंद्रगडाहून संत मच्छिंद्रनाथांची ७) सासवडहून संत सोपानदेवांची ८) अरणगावहून संत सावता माळी यांची. या सर्व पालख्या आषाढ दशमीदिवशी पंढरपूरला पोहोचतात व एकादशीला




विठ्ठलाचे दर्शन घेतात. 'माझे माहेर पंढरी' अशी सर्वांची आंतरिक भावना असते. संत तुकारामांचे सुपूत्र नारायणबाबा यांनीही सांप्रदायाचे सातत्य टिकविण्यासाठी प्रयत्न केलेला होता. त्यांनीच पालखीची सुरुवात इ. स. १६८५ ला केली. तत्पूर्वी पंढरपूरला वारकऱ्यांच्या दिंड्या जात होत्या. नंतर त्यांनी ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या पादुका पालखीत ठेवून आषाढीची पालखी सुरू केली. ज्ञानोबा-तुकाराम हे वारकऱ्यांचे भजन त्यांनीच सुरू केले, असा उल्लेख आढळतो. एकनाथ, निळोबा इत्यादी संतांनी ही वारी सुरू ठेवली. पूर्वी ज्ञानेश्वरांच्या पादुका गळ्यात घालून पंढरपूरला जात. त्याला पुढे हैबतरावांनी सामुदायिक स्वरूप दिले. दिंडीच्या स्वरूपात वारकरी पंढरीला जात. त्यात बदल होऊन पालखीची सुरुवात झाली. दिंडीबरोबर हत्ती, घोडे असा लवाजमा होता. आज पालखीबरोबर वृद्धांसाठी व स्त्रियांसाठी ट्रकची व्यवस्था केली जाते. त्यात शिधा व औषधांची सोय केलेली असते.

अशी ही एकादशी सर्वसामान्य एकादशी नाही तर ती महाएकादशी म्हणून ओळखली जाते. त्यावेळेपासून पुढे चातुर्मास पाळला जातो. हे दिवस पावसाळ्याचे असल्यामुळे आहारामध्ये नियमितपणा राखण्यासाठी काही पदार्थ जसे कांदा, लसूण वगैरे वर्ज्य करावे, असे नियम पाळले जातात. या एकादशीला देवशयनी एकादशी असेही म्हणतात. कारण श्री भगवान विष्णु आषाढी एकादशीपासून पुढे चार महिने सर्व उद्योग सोडून त्या काळात आपल्या शेष नावाच्या नागाच्या अंगावर झोपी जात असत व विश्रांती घेत असत. म्हणून आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी म्हणतात. संत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, नामदेव, चोखामेळा, जनाबाई, सखुबाई, कान्होपात्रा, गोरा कुंभार, दामाजी, सावता माळी वगैरे संतांनी पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा वाढविला. आज प्रत्येक वर्षी दक्षिणेकडून उत्तरेपर्यंत भारतातून लाखो भक्तगण यात्रेच्या निमित्ताने पंढरीला येत असतात. पंढरपूरला दक्षिण काशी तसेच संतांचे माहेर समजतात. पूर्वी या पंढरपूरला पंढरी, पांडुरंगपूर, पौंड दिव्य क्षेत्र, पंडरंगे, पांडुरंगपल्ली अशी नावे होती. शालिवाहनाने इ. स. ८३ ला या क्षेत्रास पंढरपूर असे नावविदिले, असा उल्लेख आढळतो.

या विठ्ठलाला **'युगे अठ्ठावीस। कर कटेवरी ठेवुनिया उभा।।'** असे म्हणतात. चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे मिळून अठ्ठावीस युगे समजली जातात. आषाढ शुद्ध एकादशी हा पंढरपूरच्या वारीचा मुख्य दिवस. या पंढरीच्या वारीला देवाची वारी म्हणतात, तर आळंदीच्या वारीचा महत्त्वाचा दिवस कार्तिक वद्य त्रयोदशी. या वारीला संतांची वारी म्हणतात. अशा वारींच्या निमित्ताने सर्व वारकरी कुठेही, कोणतेही आवतन न देता केवळ माऊलीच्या प्रेमापायी या वारीमध्ये जमलेला असतो. जणू ही राष्ट्रीय एकात्मतेची गंगोत्रीच होय.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायक्षेत्र)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

## संमिश्र

## आरव साळोखेचा राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत चॅम्पियन म्हणून गौरव



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गोवा येथे झालेल्या १० व्या नॅशनल लेव्हल अबॅकस चॅम्पियनशिप २०२५ मध्ये लिटल हार्ट इंग्लिश मीडियम स्कूल, पाचगाव येथील विद्यार्थी कु. आरव अर्जुन साळोखे याने राष्ट्रीय चॅम्पियन होण्याचा बहुमान पटकावला.याबद्दल माजी लोकायुक्त सरपंच संग्राम पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी ऋषिकेश पाटील, पंकज शिरगावे, अनघा जोशी व अर्जुन साळोखे यांनी आरवचा सत्कार करून त्याचे अभिनंदन केले. हा गौरव पाचगावसह कोल्हापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरला आहे.

## स्कोडा इंडियाने गाठला सर्वोच्च सहामाही विक्रीचा टप्पा




**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

स्कोडा ऑटो इंडिया प्रगतीच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करत आहे, जेथे भारतात २५ वा वर्धापन दिन आणि जागतिक स्तरावर १३० वे वर्ष साजरा करत आहे. २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटोने भारतातील आपल्या २५ वर्षांच्या इतिहासामध्ये सर्वोच्च सहामाही विक्री संपादित केली आहे.'स्कोडा'चे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, आमच्या महत्त्वपूर्ण सहामाही विक्रीमधून भारतातील ग्राहकांनी स्कोडा उत्पादने व सर्विसेसचा केलेला अवलंब दिसून येतो. आमच्या ग्राहकांना दररोज विश्वातील सर्वोत्तम स्थळांना एक्स्प्लोअर करायला आवडते. आमच्या पोर्टफोलिओमध्ये कायलॅकची भर करण्यासह आम्ही आता 'एसयूव्ही फॉर एव्हरीवन'च्या माध्यमातून, तसेच आमच्या सेदान ऑफरिंगच्या माध्यमातून त्यांचा प्रवास अधिक सुखकर व उत्साहवर्धक करत आहोत.२०२५ च्या पहिल्या सहामाहीत ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटो इंडिया आता भारतातील टॉप सात ऑटोमोटिव्ह ब्रँड्समध्ये सामील झाली आहे. २०२४ मधील रँकिंगच्या तुलनेत कंपनीने चार पोझिशन्स वर झेप घेतली आहे. तसेच, स्कोडा ऑटो इंडियाने २०२२ मधील २८,८९९ युनिट्सच्या सर्वोत्तम सहामाही विक्रीला मागे टाकले आहे.

## सर्जेरावसागावकरयांचंसमाजहितासाठी कार्य : सत्यजित पाटील



**कोतोली : हॅलो प्रभात**

सर्जेराव सागावकर यांचं समाजहितासाठी कार्य आहे, त्यांनी परखंदळे येथे समाजाभिमुख काम केले आहे.

कोतोली पैकी माळवाडी (ता. पन्हाळा) येथील शिवतेज शिक्षण संस्था संचलित श्री रामचंद्र पवार हायस्कूल, परखंदळे येथील लिपिक सर्जेराव सागावकर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गौरव समारंभ संपन्न झाला.यावेळी माजी आमदार सत्यजित पाटील बोलत होते.या प्रसंगी शिक्षक नेते दादासाहेब लाड, शिवतेज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्याम पवार, माजी आमदार सत्यजित पाटील, महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे कार्याध्यक्ष बाबासो पाटील, तसेच मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष राहुल पवार यांच्या शुभहस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक बाबासाहेब चौगले होते. यावेळी बोलताना माजी आमदार सत्यजित पाटील यांनी सांगितले, सेवानिवृत्तीनंतरचे जीवन समाजसेवेस अर्पण केल्यास खरे आत्मिक समाधान लाभते.


दादा लाड म्हणाले, सर्जेराव सागावकर यांनी लिपिक पदाची जबाबदारी नेटाने पार पाडत शिक्षण संस्थेच्या उभारणीत सचिव म्हणून मोलाचे योगदान दिले आहे.कार्यक्रमास उत्तम पाटील, मनोहर पाटील, राजाराम शिंदे, प्रकाश कोकाटे, जीवन पाटील, तानाजी चौगुले, पी.एम.पाटील, आर.बी.पाटील, एस.डी.पाटील, अण्णासाहेब गायकवाड, सागर पाटील, पांडुरंग सागावकर, आर. टी. सागावकर, नामदेव खोत, सचिन गायकवाड, जयकुमार पाटील यांच्यासह शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## आरआयटीमध्ये एआय मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि आईई आरआयटी चॅटर यांच्या संयुक्त विद्यमाने. २३ जून २०२५ रोजी 'एआय मार्गदर्शन आणि कौशल्प वृद्धी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. राजाराम सॉल्व्हेक्स लि.च्या कर्मचाऱ्यांसाठी ही कार्यशाळा घेण्यात आली.

या उपक्रमात चॅटजिपीटी आणि इतर आधुनिक एआय टूल्सचा वापर कार्यालयीन संवाद, माहिती मिळ वणे, दस्तऐवज व अहवाल लेखन, गुणवत्ता नियंत्रण तसेच सोयाबीनपासून तेल निर्मिती प्रक्रियेतील निरी क्षण, नोंदी आणि कामकाज सुधारणा यांसाठी कसा करता येतो, हे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगण्यात आले.मायक्रोसॉफ्टऑफिस सॉफ्टवेअर्सचा प्रभावी वापर आणि मिटींगची नोंद करणे यासाठी एआय कसा उपयुक्त ठरतो, यावरही भर देण्यात आला. यंत्रसामग्रीची देखभाल



व इंग्रजी संवाद कौशल्य वृद्धी साठीही एआय कसा मदत करू शकतो, हे स्पष्ट करण्यात आले.

या कार्यशाळेत कॉम्प्युटर सायन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स विभागाचे प्रमुख डॉ. सचिन पाटील यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचे सादरीकरण केले. प्रा. गणेश वेदपाठक आणि प्रा. प्रगती पाटील यांनी एआय चा वापर दर व्यवस्थापन व बियाण्यांच्या गुणवत्ता तपासणीमध्ये कसा करता येतो, याचे मार्गदर्शन केले. प्रा. अपूर्वा मोहिते यांनी मिटींगची नोंद करणे आणि गुणवत्ता व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. ए.ए.जाधव आणि ए.जे.काटे यांनी मायक्रोसॉफ्ट ऑफिस मध्ये एआप चा प्रभावी वापर कसा करता येतो, यावर प्रशिक्षण दिले. प्रा. महेश व्हटकर यांनी यंत्रसामग्रीची देखभाल आणि इंग्रजी संवादासाठी एआय कसा उपयुक्त ठरतो, याची माहिती दिली.

या कार्यशाळेला राजाराम सॉल्व्हेक्सचे व्यवस्थापकीय संचालक व्ही.एम.कर्डीले उपस्थित होते.

त्यांनी राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या या उपक्रमाचे कौतुक करत, उद्यो गातील कामकाज अधिक प्रभावी करण्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांची गरज अधोरेखित केली.कार्यक्रमाचा समारोप प्रा. गणेश वेदपाठक यांच्या आभारप्रदर्शनाने झाला. यावेळी कासेगाव एज्यु केशन सोसायटीचे सचिव प्रा.आर. सावंत आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. पी.व्ही.कडोले यांचे मार्गदर्शन लाभले.

## आमदारांचेच ठेकेदार ऐकत नाहीत

### वैभव आढाव; तर ही त्यांच्या निष्क्रियतेची पावती

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव मतदारसंघात सध्या निधी उपलब्ध असूनही विकासकामांचा बोजवारा उडालेला आहे. सत्ताधारी आमदारांचे पदाधिकारीच कामे होत नसल्याचे निवेदन देत असल्याने विकास कामे किती अडथळ्यांत अडकली आहेत, हे स्पष्ट होते. जेव्हा खुद्द आमदारांचेच ठेकेदार ऐकत नाहीत, तेव्हा सामान्य जनतेचे काय ऐकणार ? असा प्रश्न उपस्थित करत भाजपा शहराध्यक्ष वैभव आढाव यांनी जोरदार निशाणा साधला आहे.

नुकतेच नगरपालिकेत आमदारांचे कार्यकर्तेच विकासकामे न झाल्याबाबत तक्रारी करताना दिसले. निधी असूनही ठेकेदार काम करत नाहीत, ही बाब अत्यंत संशयास्पद आहे. मतदारसंघात ठेकेदार कोणाचे आहेत? त्यांना कामे कोण करू देत नाही ? नक्की निधी उपलब्ध आहे की आजवर फक्त हजारो कोटींचा केवळ कांगावा झाला हे जनतेसमोर यायला हवे. केवळ शहरच नव्हे, तर संपूर्ण मतदारसंघातील विकासाचे ऑडिट करणे आता काळाची गरज झाली आहे.अनेक ठिकाणी रस्ते निकृष्ट दर्जाचे का केले आहेत? ठेके मिळवण्यासाठी काही पडद्यामागचे व्यवहार तर कुणी करत नाही ना ? यावर देखील खुलासा होणे आवश्यक आहे. हजारो कोटींचा निधी आला तरी तो नेमका गेला कुठे? निधी असून कामे नसेल होत तर मग तो निधी जातो कुठे असा सवाल करत आढाव यांनी सत्ताधाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

भाजपने युती धर्म पाळत आमदार काळेंना सत्तेत आणले, मात्र त्यांचे कार्यकर्ते जर त्यांच्या विरोधकांची भूमिका घेत असतील आणि कोणी तरी व्यक्ती कामे होऊ देत नाही असे म्हणत असतील, तर याचा अर्थ सत्तेत असूनही आमदार साहेब अस्तित्वात नाहीत असा गैरसमज जनतेत पसरतो आहे.याशिवाय ठेकेदार आमदारांचे ऐकत नसतील तर पाणी कुठे मुरते आहे हे गंभीर आहे. सत्ताधारी मित्रपक्षांचे पदाधिकारी जर असे बेछूट वक्तव्य करत असतील, तर ते प्रत्यक्षात आमदारांच्या निष्क्रियतेची कबुलीच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जर लोकप्रतिनिधींचा प्रशासनावर वचक नसेल, तर मतदारसंघ अडचणीत येतो.

अवैध धंदे, गुन्हेगारी आणि जनतेच्या समस्या वाढत असताना सत्ताधारी जर स्वतःच गळा काढत असतील, तर जनतेने काय समजून घ्यावे? असा रोखठोक सवाल करत आढाव यांनी रस्त्यांच्या कामांमागे शिफारशी, संमती आणि काही वेगळे असल्यास त्या व्यवहारांची चौकशी व्हावी अशी अपेक्षा आढाव यांनी व्यक्त केली आहे.

## प्रकाश पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

पोर्ले तर्फ ठाणे येथील माजी जिल्हा परिषद सदस्य श्री प्रकाश सर्जेराव पाटील आण्णा यांनी वाढदिवसा दिवशी पुष्पगुच्छ न स्वीकारता शालेय वह्या स्वीकारून वाढदिवस साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी म्हणून गावातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप करण्यात येते.

प्रकाश पाटील हे माजी जिल्हा परिषद सदस्य आहेत. त्यांच्या कालखंडामध्ये गावाचा विकास म्हणून गावामध्ये प्राथमिक ग्रामीण रुग्णालय ,मराठी शाळेची भव्य इमारत ,ग्रामपंचायत ऑफिस व व्यापारी संकुल उभा करून गावाचा विकास साधला आहे.

अण्णांनी गावचे ग्रामदैवत मसाई देवी मंदिराला ब वर्ग दर्जा मिळवून पाच कोटी रुपये मंदिर व परिसर बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता आणली आहे.पोर्ले गावचे ग्रामदैवत श्री मसाई देवी मंदिर येथे श्री प्रकाश पाटील अण्णा यांच्या वाढदिवसाच्या समारंभ निमित्त सायंकाळी सोनचाफा फुलाचा अभिषेक व महाआरती करून प्रसाद वाटप करण्यात आले.

## जि. प.शाळेत पालखी सोहळ्याचे आयोजन

**माणकोबावाडी : हॅलो प्रभात**

आषाढी वारीचे औचित्य साधून माणकोबावाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वृक्ष दिंडी व ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेतील विध्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी , संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताबाई अशा विविध संतांची वेशभूषा केली होती. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोहर खताळ आणि सामाजिक कार्यकर्ते मल्हारी बिचकुले यांच्या हस्ते आरती करून पालखीचे प्रस्थान श्री सिद्धनाथ मंदिराच्या दिशेने झाले. जाताना विध्यार्थ्यांनी अभंग गायन केले तसेच वृक्ष लागवडीचे महत्व पटवून दिले. सिद्धनाथ मंदिरात पालखी पोहोचल्यावर आरती



करण्यात आली.

तसेच विध्यार्थ्यांनी विविध अभंगाचे गायन केले. सिद्धनाथ मंदिरातील महिला भजनी मंडळाने विविध भजनांचे गायन केले. यामुळे विध्यार्थी व पालक भक्तीरसात दंग झाले होते.

यावेळी फुगडी खेळण्याचा आनंद सर्वांनीच लुटला. तसेच अभंगच्या तालावर अबालवृद्धांनी ठेका धरला होता. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही भाऊसो खताळ यांनी विध्यार्थ्यांना लाडू वाटप केले. तसेच सिद्धनाथ अर्थ मुव्हर्स चे दादा धुळा भिसे यांनी सर्वांना बिस्कीट पुड्यांचे वाटप केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती माने यांनी मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी बोलताना मुख्याध्यापिका स्वाती माने ( हुंबे ) म्हणाल्या कि विध्यार्थ्यांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव यावा, त्यांच्यामध्ये वारकरी सांप्रदायाविषयी आदर निर्माण व्हावा, आपली परंपरा व संस्कृती यांची विध्यार्थ्यांना ओळख व्हावी तसेच वृक्ष लागवडीचे महत्व पटावे, ग्रंथ , पुस्तक वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने असे उपक्रम शाळेत राबविले जातात. संदिप साळवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विक्रम लांडगे यांनी सर्वांचे आभार मानले.

याप्रसंगी देवकरवाडी ग्राम पंचायत माजी सदस्या सरस्वती अनिल देवकर, अंगणवाडी सेविका सुवर्णा शिवतरे , लालूबाई गायकवाड, निलिमा चौधरी, रेणुका कांचन,आशा खताळ, सुस्मिता मोरे, निकिता बिचकुले, कोमल बिचकुले, तृप्ती शिंदे, स्वाती बिचकुले, गौरी शिंदे, शिलाबाई कऱ्हे, तसेच पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**सखाराम फर्निचर मॉल**

कांगांव. ता.करवीर, जि.कोल्हापूर.



लग्नकार्य,वास्तुशांती, गृह सजावट, गृहबांधणी, इ. प्रेझेंटसाठी लागणाऱ्या सर्व व्हरायटीज मिळण्याचे एकमेव ठिकाण

संपर्क - ९९६०७११५१४

सर्व नागरिकांना नंदवाळ यात्रेच्या शुभेच्छा..!




सर्व नागरिकांना नंदवाळ यात्रेच्या शुभेच्छा..!


## अधिकाऱ्यांनी दिली आरोग्य सेवा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गडहिंग्लज तालुक्यामधील बड्याची वाडी या गावांमध्य सुंदराबाई सिद्धू दळवी या ९५ वर्षाच्या आजी राहतात त्यांची दोन्ही मुले मुंबईला असतात २४ जून रोजी रात्री त्यांना अशक्तपणाचा त्रास झाला.

यावेळी गावातील ग्रामसेवकांनी आवरून आल उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अरुणा तोडकर यांच्याशी संपर्क केला. यावेळी मुख्य रस्त्यापासून गावापर्यंत चिखलीयुक्त रस्ता आहे. या निसरड्या चिखल युक्त रस्त्यामधून वाट काढून समुदाय आरोग्य अधिकारी रुग्णापर्यंत पोहोचले, त्यांच्यावरती उपचार केले आणि बैलगाडी मधून मुख्य रस्त्यापर्यंत पाठविले. तिथून रुग्णास कोल्हापूरच्या सीपीआर रुग्णालयामध्ये ऍडमिट करण्यात आले. या रुग्णास इतर खाजगी डॉक्टरांनी उपचारासाठी बोलविण्यात आले. परंतु रस्ता नसल्यामुळे कुणीही डॉक्टर रुग्णावरती उपचार करण्यास तयार नव्हते. पण समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.अरुणा तोडकर यांनी कर्तव्यास प्राधान्य देऊन चालता येत नसलेल्या चिखलीयुक्त रस्त्यावरून जाऊन रुग्णावरती उपचार केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जाहीर नोटीस

मौजे चोरोची, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली येथील व परिसरातील तमाम लोकांना आमचे अशिल श्री. प्रभु धोंडीबा यमगर, रा. चोरोची, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली यांनी दिले माहितीवरुन व दाखविले कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळिवणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन जिल्हा तुकडी सांगली तालुका पोटतुकडी कवठेमहांकाळ पैकी मौजे चोरोची येथील जमीन मिळकत त्याचा गट नं. ३१३, क्षेत्र हे. ८.०६ आर, पो.ख.०.०१ आर, आकार रु.८.७५ पैसे संपूर्ण मिळकत.

२) वर नमुद केलेली मिळकतीचे मुळची कै. धोंडीबा हरीबा यमगर यांची वाडवडिलार्जीत मिळकत होय. सदरची मिळकत तुकाराम गणपती पारेकर यांना विक्री करतेवेळी आमचे अशिलांची खरेदीपत्रास संमती घेतलेली नव्हती व नाही. आमचे अशिलांचा सदर मिळकतीमध्ये नामवेशिर हक्क, हिस्सा, हितसंबंध आहे सदरची मिळकत ही आमचे अशिलांचे वडिलांची फसवणुक करून तुकाराम गणपती पारेकर खरेदी करुन घेतलेली होती. तुकाराम गणपती पारेकर यांना सदरची मिळकत सध्या विक्री करणेची आहे, असे आमचे अशिलांना समजून आले व आमचे अशिल हे सध्याच्या बाजारभावाप्रमाणे सदरची मिळकत घेणेस सदैव तयार आहेत. तसेच मिळकत ही एकाच गटातील असल्याने व लगत हिस्सेदार असल्याने आमचे अशिलांना सदरची प्रथमतः खरेदी घेणेचा हक्क आहे

३) सदरची मिळकत तुकाराम गणपती पारेकर हे आमचे अशिलांना डावलून ति-हाईत इसमास विल्हे, विक्री, करणेचा प्रयत्न करीत असल्याचे माहीती आमचे अशिलांना तोंडी समजून आलेले आहे.

४) तरी सदर या नोटीसीने कळिवणेत येते की, आमचे अशिलांव्यतिरिक्त अन्य कोणाबरोबर तुकाराम गणपती पोरकर यांनी सदर मिळकतीबाबत व्यवहार करु नये, यदाकदाचित खरेदीपत्राचा व्यवहार झाल्यास, खरेदी घेणार यांची फसवणुक होणार आहे, ती फसवणुक होवू नये, म्हणून सदरची जाहीर नोटीस देत आहे. वर नमुद मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा कायदेशिर हक्क, हितंसबंध असल्याचे स्पष्ट होईल, आमचे अशिल हे लगत हिस्सेदार असल्याने प्रथम खरेदी घेणेचा हक्क आमचे अशिलांचा आहे. याउपर आमचे अशिलांना डावलून ति-हाईत इसमास सदरची मिळकत विल्हे, विक्री, तबदिली केल्यास तो व्यवहार आमचे अशिलांच्या हिस्यावर बंधनकारक राहणार नाही. त्यामुळे सदर मिळकतीबाबत कोणीही इसमांनी व्यवहार करु नये अन्यथा त्याची फसवणुक होईल याची नोंद घ्यावी.

म्हणून दिली जाहीर नोटीस

कवठेमहांकाळ
दि.०२/०७/२०२५

सही /-
**ॲड. विजय सदाशिव शेजाळ**
**बी.एस.एल, एल. एलबी**
**रा. हिंगणगांव, कवठेमहांकाळ.**
**ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली.**
**मो. नं.९२८४८४५५६८,९४२१९१०००४**

## ग्रामपंचायत पाचुंब्री ता.शिराळा,जि.सांगली

### जाहीर निविदा नोटीस

**ग्रामपंचायत पाचुंब्रीकडून १५ वा वित्त आयोग निधीमधून खालील कामांची ब-१ निविदा मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | योजनेचे नाव | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | कोऱ्या निविदा पत्रिकेची किंमत | बयाना रक्कम | मक्तेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग सन २०२०/२१ बंधित निधी | गावांतर्गत आर.सी.सी.गटर | ४५,९४७/- | १००/- | ४६०/- | मजूर सोसायटी |
| २ | १५ वा वित्त आयोग सन २०२०/२१ बंधित निधी | गावांतर्गत आर.सी.सी.गटर | ६६,१७६/- | १००/- | ६६२/- | सु.बे. |
| ३ | १५ वा वित्त आयोग सन २०२१/२२ बंधित निधी | न.पा.पु.योजना विहीरीवरील कामे | १,५०,०००/- | १००/- | १५००/- | सु.बे. |
| ४ | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२४ | न.पा.पु.सोय करणे, स्मशानभूमी | ८५,०००/- | १००/- | ८५०/- | मजूर सोसायटी |
| ५ | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२४ बंधित निधी | गावांतर्गत आर.सी.सी.गटर | २४,०००/- | १००/- | २४०/- | मजूर सोसायटी |
| ६ | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२५ बंधित निधी | सार्वजनिक विहीर बांधकाम | ३,२६,०००/- | १००/- | ३२६४/- | सु.बे. |
| ७ | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२४ बंधित निधी | प्राथमिक शाळा सुशोभिकरण करणे. | १,८८,९७४/- | १००/- | १८९०/- | सु.बे. |
| ८ | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२४ अबंधित निधी | मागासवर्गीय वस्तीत रस्ता बांधकाम करणे. | ६१,२१४/- | १००/- | ६१२/- | खुला |
| ९ | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२५ | गावाअंतर्गत सांडपाणी व्यवस्थापनासाठी गटर बांधणे. | ३,२६,४४३/- | १००/- | ३२६४/- | खुला |
| १० | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२५ | गावांतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १,७७,६०३/- | १००/- | १७७६/- | खुला |

**नियम व अटी :**

१) निविदा विक्री व स्वीकृती कार्यालयीन वेळेत दि. ०६/०७/२०२५ ते १५/०७/२०२५
२) निविदा भरताना सादर करावयाची कागदपत्रे मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, बयाणा रक्कम भरलेली पावती झेरॉक्स इ.
३) कामाची मुदत ६ महिने
४) सदर निविदा लगतच्या मासिक सभेत उघडणेत येईल.
५) निविदा मंजुर अगर नामंजुर करणेचा अधिकार ग्रा.पं.चा राहील.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत पाचुंब्री
ता.शिराळा,जि.सांगली

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत पाचुंब्री
ता.शिराळा,जि.सांगली

दैनिक
# हॅलो प्रभात
■ सांगली ■ कोल्हापूर ■ रविवार, ०६ जुलै २०२५





# जीएसटी आजच्या अर्थव्यवस्थेचा कणा : किशोर लुल्ला

## वसंतरावदादा महाविद्यालयात वाणिज्य मंडळ उद्घाटन




**तासगाव : हॅलो प्रभात**

टॅक्सेशन मध्ये करियर करण्यासाठी बी.कॉम.च्या विद्यार्थ्यांना मोठ्या संधी आहेत. जीएसटी कायदा समजून घ्या. जीएसटी आजच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे उद्गार 'लुल्ला चॅरिटेबल ट्रस्टचे' संस्थापक किशोर लुल्ला यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे वाणिज्य मंडळ उद्घाटन प्रसंगी बोलताना काढले. ते पुढे म्हणाले जीवनावश्यक वस्तूंना टॅक्स लागत नाही.जीएसटी सहा प्रकारे आकारली जाते हे सांगून जीएसटी कायद्याचा अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. शून्य टक्के, तीन टक्के, पाच टक्के, बारा टक्के, अठरा टक्के , अठ्ठावीस टक्के जीएसटी कोणकोणत्या उत्पादनावर लावला जातो हे सोदाहरण सांगितले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी स्किल ओरिएंटेड कार्यक्रम घेणे हाच नवीन शैक्षणिक धोरणाचा उद्देश असल्याचे सांगून ज्ञान, विज्ञानाबरोबरच सुसंस्कारी विद्यार्थी घडविणे हाच आमचा ध्यास असल्याचे सांगितले. वाणिज्य विभाग वर्षभर राबवित असलेल्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमाबद्दल त्यांचे कौतुक केले व कॉमर्स असोसिएशनच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या वर्षभरातील सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.अमोल सोनवले यांनी केले.पाहुण्यांचा परिचय डॉ.श्रुती परचुरे यांनी केला तर आभार प्रा.जी.आर.पाटील यांनी मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य जे.ए. यादव, प्रा.नेहा मोरे, ॲड.निलेश कुंभार, प्रा.एस. एच.यमगर, प्रा.एस.एस.पाणारी, डॉ.अर्जुन वाघ, प्रा.रमेश मोटे, डॉ.सुनिल गावीत, प्रा.रामा रोकडे, डॉ.अमित माळी यांसह वाणिज्य विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.राहुल कुल यांनी जन आरोग्य योजना संदर्भात वेधले



**दौंड : हॅलो प्रभात**

महात्मा ज्योतिराव फुले जन योजनेतून गोर गरीब जनतेला दर्जे दार, मोफत आणि सवलतीच्या दरात उपचार मिळावेत यासाठी चालू पावसाळी अधिवेशनात आमदार राहुल कुल यांनी याबाबत लक्षवेधी सूचना चर्चेद्वारे सभागृहात मांडल्या.

यासंदर्भात, धर्मादाय रुग्णालयांना योजना बंधनकारक करावी, उपचारांचे दर वाढवावेत, औषधांचा समावेश या योजनेत करण्यात यावा आणि रुग्णांना मदत न करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करावी व रुग्ण सेवक व सोशल वर्कर त्वरित मदत देण्यासाठी आदेश द्यावेत अशा अनेक महत्वपूर्ण योजनेकरीता आ. कुल यांनी लक्ष वेधले. गोर गरीब जनतेला दर्जेदार व मोफत आणि सवलतीच्या दरात उपचार मिळावेत, हा माझा मुख्य उद्देश आहे. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी राज्यातील सर्व धर्मादाय म्हणजेच चॅरिटेबल रुग्णालयांनी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना बंधनकारक करण्यात आली असल्याचे सकारात्मक आश्वासन मिळाले असून आपण या संदर्भात सातत्याने रुग्ण तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे नमूद केले.

# वारणावती वसाहतीत अजगरांचं साम्राज्य



**शिराळा : नारायण घोडे पाटील**

चांदोली परिसरातील वारणावती वसाहत वन्य प्राण्यांचं आश्रयस्थान बनू लागली आहे. वारणा प्रकल्प कर्मचाऱ्यांच्या साठी बांधलेली ही वसाहत सध्या अखेरची घटका मोजू लागली आहे. जीर्ण अवस्थेत झालेल्या मोकळ्या आणि पडक्या खोल्या. अवतीभवती वाढलेलं झाडाझुडपांचं साम्राज्य यामुळे गवे, बिबटे यांचे येथे वारंवार दर्शन होत आहे. यातच आता अजगराची भर पडली आहे. गेल्या वर्षभरापासून वारंवार या वसाहतीत अजगराचं दर्शन होऊ लागला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

मणदूर मुक्कामी येणाऱ्या शिराळा मणदूर या बस समोरच परवा रात्री सव्वा नऊच्या सुमारास वारणावती येथे भला मोठा अजगर आला. चालकाने तात्काळ बस थांबून त्याचे चित्रीकरण केलं.संथ गतीने तो वारणा प्रकल्प कार्यालय परिसरातील झाडाझुडपात लिहून गेला.

गेल्या पंधरा दिवसांपूर्वी वसाहती मधील करमणूक केंद्राजवळ रात्री सव्वा आठच्या अनेक युवकांना त्याच दर्शन झालं.काही महिन्यांपूर्वी मणदूर येथील हुतात्मा स्मारक परिसराच्या पाठीमागे असणाऱ्या उसाच्या शेतात दहा फूट लांबीचा भला मोठा अजगर सर्पमित्रांनी पकडून सुरक्षित स्थळी सोडला. याच दरम्यान वारणावती वसाहती मधील मध्यवर्ती ठिकाणी रात्री नऊच्या सुमारास बारा फूट लांबीचा ६० ते ७० किलो वजनाचा अजगर झाडावर युवकांना दिसला. सर्पमित्रांच्या मदतीने त्याला पकडून वन्यजीव कर्मचाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आला.

# प्रकाश गडळे यांच्या कडून वारकऱ्यांना रेनकोट वाटप



**कडेगाव : हॅलो प्रभात**

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूर येथे पायी दिंडीत चालणाऱ्या वारकऱ्यांना व संत बाळूमामा यांच्या बघा क्रमांक ७ मधील मेंढपाळ सेवकांना भाजपाचे सांगली जिल्हा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश गडळे व अमरापूरच्या लोकनियुक्त सरपंच सुनिता गडळे यांच्या कडून पावसाळी रेनकोटचे वाटप करण्यात आले.

यावेळी विलास मोरे, माजी सरपंच रेखा मोरे, मोहन मोरे, वसंत जाधव, कुमार शिंदे, धनाजी पवार, यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# तानाजी चवरे यांची यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी निवड



**शिराळा : हॅलो प्रभात**

साळशिरंबे (ता.कराड) येथील सुप्रसिद्ध कुस्ती संघटक तानाजी चवरे यांची यशवंतराव चव्हाण फाउंडेशन, मुंबई तर्फे देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित 'यशवंतराव चव्हाण पुरस्कार २०२४-२५' साठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्काराची घोषणा फाउंडेशनचे अध्यक्ष संजय रत्नाबाई किसन सावंत यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली.या पुरस्काराचे वितरण १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजता घणसोली, नवी मुंबई येथे होणाऱ्या विशेष कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

तानाजी चवरे यांनी गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने कुस्ती क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील कुस्ती चळवळ त्यांनी नव्या उंचीवर नेली. त्यांनी नवीन दांव-पेच रुजवत कुस्तीच्या प्रशिक्षण व आयोजनात उत्कृष्ट व्यवस्थापन कौशल्य दाखवले. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या गौरवप्राप्तीनंतर आमदार डॉ.अतुल भोसले, कुस्तीप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते तसेच क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी तानाजी चवरे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिराळकरांना जिवंत नागाची पूजा करण्याची संधी मिळावी

## प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांची विधानसभेत मागणी

**शिराळा : हॅलो प्रभात**

शिराळकरांना पुन्हा जिवंत नागाची पूजा करण्याची संधी मिळावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी सुचनेद्वारे केली.



सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात नागपंचमीला आगळेवेगळे महत्त्व आहे. या भागात पूर्वी जिवंत सापांची पुजा केली जायची पण सन २००२ पासून न्यायालयाची बंधन आली. त्यामुळे ही बंधने उठवण्यात यावी असे ते म्हणाले. नागपंचमी सणाला जिवंत नागाची विधीवत पूजा करताना त्यांना कुठल्याही प्रकारची इजा होऊ नये आणि त्यांच्या जिवीतास धोका निर्माण होऊ नये याची खबरदारी शिराळकरांकडून घेण्यात येते तसेच, पूजा झाल्यानंतर त्यांना सुखरूपपणे नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येते. त्यामुळे शिराळकरांना पुन्हा जिवंत नागाची पूजा करण्याची संधी मिळावी, यासाठी राज्याचे वनमंत्री प्रयत्न करतील का? असा प्रश्न त्यांनी सभागृहात उपस्थित केला.

# एस.एस.जी.एम महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट




**कोपरगाव : हॅलो प्रभात**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज कोपरगाव महाविद्यालयातील करिअर कौन्सिलिंग आणि प्लेसमेंट सेल, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक सायन्स, संगणक विज्ञान विभाग, आय.क्यू.ए.सी. व डायरेक्टोरेट ऑफ फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज मुंबई या विभागाच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह चे आयोजन केलेले होते.

सदर मुलाखतीसाठी डायरेक्टोरेट ऑफ फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज मुंबई यांच्या वतीने सी. एम. एस. कॉम्प्युटर्स तर्फे योगेश बिरमोळे, जितेंद्र शिंत्रे आणि अतुल कुमार या तज्ञांची समिती आली होती. या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये एकूण १३४विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

सदर उपक्रमाचे प्रास्ताविक विज्ञानशाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत यांनी केले. तर करियर कौन्सिलिंग आणि प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा.दिलीप भोये यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा.अरुण देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले.

# बापूसाहेब येसूगडे संग्राम पतसंस्थेस कार्यक्षेत्र वाढीस मान्यता

**कुंडल : हॅलो प्रभात**

स्व.बापूसाहेब येसूगडे यांनी स्थापन केलेल्या व श्रीमती.ज्योत्स्ना येसूगडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली वाटचाल करीत असलेल्या बापूसाहेब संग्राम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेला कोल्हापूर विभागीय (सांगली जिल्हा, कोल्हापूर जिल्हा व सातारा जिल्हा) कार्यक्षेत्र वाढीस सहकार आयुक्त व निबंधक महाराष्ट्र राज्य पुणे यांची परवानगी मिळालेली आहे.

संस्थेची स्थापना दिनांक ३०/१० १९९८ साली झाली असून संस्थे सुरुवातीपासून ऑडिट वर्ग 'अ 'आहे.संस्था अखंडीतपणे गेली २६ वर्ष सभासदांना ११ टक्के लाभांश देत आहे.जून २०२५ अखेर संस्थेकडे भाग भांडवल एक कोटी २५ लाख ठेवी रु. १२० कोटी, कर्ज रू.८५ कोटी, बँकेतील गुंतवणूक रु. ३७ कोटी सुनिधी नऊ कोटी व एकूण व्यवसाय २१० कोटी इतका आहे. सध्या संस्थेच्या १८ शाखा कार्यरत असून सर्व शाखा नफ्यात आहेत. संस्थेने सभासदांचा व ठेवीदाराचा विश्वास संपादन करून प्रगतीची वाढती कमान चालू ठेवली आहे. संस्थेचा पारदर्शक कारभार व सहकार खात्याचे जिल्हा कार्यक्षेत्र वाढीचे सुधारित सर्व निकष पूर्ण केल्यामुळे संस्थेस कोल्हापूर विभागीय कार्यक्षेत्र वाढीस नुकतीच सहकार खात्याची मंजुरी मिळालेली आहे अशी माहिती संस्थेचे चेअरमन निलेशभैय्या येसूगडे यांनी दिली. ते पुढे म्हणाले की संग्राम पतसंस्था स्थापने पासून प्रगतीच्या बाबतीत चढती कमान असून याचे श्रेय संस्थेचे सभासद, ठेवीदार संचालक मंडळ व संस्थेचा सेवक वर्ग यांना दिले जाते.

संस्था चालू आर्थिक वर्ष रु. ३०० कोटीचा व्यवसाय पूर्ण करेल असा विश्वास व्यक्त केला.

# ऐश्वर्या पाटील ची स्पर्धा परीक्षेमधून A. E. Class -2 पदी निवड



**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

नंदकुमार पाटील व सौ वैशाली पाटील यांची कन्या कु.ऐश्वर्या नंदकुमार पाटील हिची महापारेषण झोन ऑफिस कराड येथे स्पर्धा परीक्षेमधून. **A. E. Class -2** पदी निवड झाल्याबद्दल शिक्षक संघ वाळवा परिवाराकडून अभिनंदन शुभेच्छा व सत्कार सोहळा संपन्न झाला.

सुधाकर पाटील कार्याध्यक्ष केंद्रप्रमुख संघटना महाराष्ट्र राज्य, तानाजी खोत पुणे विभागीय अध्यक्ष, माणिकराव पाटील ज्येष्ठ मार्गदर्शक, शिवाजी चव्हाण, माजी अध्यक्ष संजय काटे, वसंतराव शिंगारे संचालक शिक्षक पतसंस्था शिक्षक नेते कुमार बल्लाळउत्तमराव पाटील, भगवान साठे माजी, केंद्रप्रमुख अर्जुन कदम, विश्वनाथ जोशी, धनाजी पाटील, मोहन सुतार, दादासाहेब खोत, शंकर साठे प्रकाश पाटील, दिलीप खोत, शिवाजी साळुंखे, विश्वास जानकर, राजाराम तिवले तसेच नवोदय विद्यालयासाठी निवड झालेली सान्हवी घाडगे, महेश घाडगे व सौ.घाडगे उपस्थित होतें.

# श्री शिवाजी हायस्कूलमध्ये कृषीदिन उत्साहात



**चिंचणी : हॅलो प्रभात**

कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील श्री शिवाजी हायस्कूल च्या परिसरात कृष्णा कृषी महाविद्यालयाच्या कृषीदुतांनी कृषीदिन वृक्षारोपण करुन उत्साहात साजरा केला.

यावेळी मुख्याध्यापक अरुण सांवत, पर्यवेक्षक सतिश मेटकरी, उमाकांत सांवत, कृषीदूत निखिल गावडे, सत्यजीत मेटकर, अभय मदवाने, विवेक कदम, सौरभ कदम, श्रेयश मोरे तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# बबनराव शिंदे यांच्यावर होणारी शस्त्रक्रिया यशस्वी होवो

## वारकऱ्यांना मोफत चहा



**टेंभुर्णी : हॅलो प्रभात**

माढा तालुक्याचे मा.आ.बबनदादा शिंदे हे सध्या अमेरिकेमध्ये असून त्यांच्यावर होणारी हृदयाची शस्त्रक्रिया यशस्वी होवो यासाठी टेंभुर्णी मध्ये विविध ठिकाणी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकरी भाविक भक्तांना मोफत चहा, अल्पोपहार, केळी, लाडू, चिवडा यासारखे अनेक खाद्यपदार्थाचे वाटप करण्यात येत आहे. आषाढी एकादशीचे औचित्य साधत असंच कुर्डूवाडी बायपास लगत असलेले श्री हॉटेलचे मालक अंकुश कुटे व शिवशंकर हॉटेलचे मालक बाळासाहेब चव्हाण यांनी दादांना दीर्घ आयुष्य लाभो व त्यांच्यावर होणारी शस्त्रक्रिया यशस्वी होवो यासाठी बुधवार व गुरुवार या दोन दिवशी वारकऱ्यांना मोफत चहा बिस्कीट वाटप केले.

व सर्व वारकऱ्यांसोबत मा आ बबनदादा शिंदे यांना दीर्घायुष्य लाभो यासाठी विठ्ठल-रुक्मिणींना साखडे घालण्यात आले. यावेळी खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडूनाना ढवळे उपस्थित होते.

हनुमंत चव्हाण, अँड सचिन चव्हाण, नवनाथ शिंदे, सुनील भोसले, पत्रकार संतोष वाघमारे, सोमनाथ नलवडे, सुरज काजी, नागनाथ गायकवाड यांनीही या उपक्रमास हजेरी लावत वारकऱ्यांना चहा वाटप करण्यास सहकार्य केले.